# चैतन्य लहरी

## मराठी आवृत्ति

खंड ४ अंक १०



तुमचं गुरुपद तुम्हाला हवं असेल तर
तुम्हाला प्रथम अबोधित बनलं पाहिजे.

– प. पू. श्री. माताजी निर्मलादेवी
श्री गणेश पूजा १९९२

# चैतन्य लहरी

● अनुक्रमणिका ●

श्री गणेश पूजा

गुरु पूजा

स्वतःचा गुरु कसं व्हायचं?

देवी सूक्त (ऋग्वेद १२५)

# श्री गणेश पूजा

## कबेला इटली, ३१-८-१९९२

श्री गणेश, अबोधिता हे गुरुचं तत्व आहे. अनसुया फार एकनिष्ठ पत्नी होती, ती इतकी धार्मिक होती, स्वतःला तिने इतकं वाहून घेतलं होतं की, ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या भार्यांना तिच्याबद्दल असूया वाटू लागली. त्यांच्या पतींना त्यांनी, ती खरोखरच शीलवती स्त्री आहे कां, याबद्दल अनुसूयेची परिक्षा घ्यायला सांगितलं. ते तिथे साधूच्या वेषांत खाली आले, अनसुयेने त्यांचं स्वागत केलं. त्यांच्यासाठी अन्न शिजविले. तुझे सर्व कपडे उतरविल्याशिवाय आम्ही ते अन्न खाणार नाही, असे ते म्हणाले. तेव्हा, तिच्या शक्तिने तीने त्यांचं तीन लहान बालकांमध्ये रुपांतर केलं. त्यानंतर तीने कपडे उतरविले कारण, अबोधितेला नग्नावस्थेची जाण नसते. त्यानंतर त्यांच्या अबोधितेचं एकत्रीकरण करून त्यांना त्यांचं गुरुपद मिळालं. अशाप्रकारे आदिगुरु तयार झाले.

तुम्हाला तुमचं गुरुपद हवं असेल तर, प्रथम अबोधिता पाहिजे. अबोधिता ही फार अस्पष्ट संज्ञा आहे. श्री गणेशांकडून आपल्याला अबोधितेचं स्वरूप कळू शकेल. सर्वप्रथम त्यांना समयोचित सूज्ञता प्रदान केली आहे. आणि ते, ती आपल्यामध्ये घालतात. ते जेनेटिक्स सारखं आहे. आपलं वागणं आणि वंश जेनेटिक्स अनुवंश शास्त्र ठरवतं. जेनेटीक्सची निवड करणारे, व आपल्यामध्ये ती वापरणारे, ते, आहेत. जेव्हां आपल्यामध्ये ते सूज्ञता घालतात तेव्हां, आपण सुज्ञ होतो. सूज्ञतेचं खरोखर एक जीन आहे. ज्याचा कांही वंशांमध्ये अभाव आहे. त्यांच्याकडे सूज्ञता नसते त्यांच्या विनाशासाठीच ते गोष्टी करतात. स्वतःला ते उच्च प्रतीचे समाजवादी, किंवा, उच्च वंशाचे म्हणतात. पण त्यांच्यामध्ये सूज्ञता नसते. त्या पातळीपर्यंत न पोहोचलेल्या कांही वंशांमध्ये सूज्ञतेचा अभाव आहे. ही सूज्ञता आपल्याला एक प्रकारच्या स्वातंत्र्याची जाणीव देते. त्यामुळे, सर्व प्रकारच्या वाईट संवयी व अंमली पदार्थापासून आपण दूर रहातो. नग्नावस्थेकडे आपल्याला पहावत नाही ज्यांच्याकडे सूज्ञता आहे त्याला अशा प्रकारचे जीवनपद्धती कधीच आवडणार नाही. विवाहबाह्य-संबंधामध्ये आपण गुंतत नाही. आपण पूर्णपणे मध्यावर असलेलं, आणि धार्मिक ते सगळं स्विकारतो. आपल्यामध्ये रुजवलेलं सूज्ञतेचं बीज आपण वाढल्यावर, आपल्याला धार्मिक लोक बनवितं. आपोआप आपणं धार्मिक बनतो. आपण ठार करीत नाही. आक्रमण करीत नाही, इतरांचा छळ करीत नाही. इतरांची जागा, घर घेत किंवा कांहीही हिरावून घेत नाही. श्री गणेशांकडून सूज्ञता येते आत्मसाक्षात्कारासांठी ते आपल्याला पूर्णपणे तयार करतात.

आपल्या आत्मसाक्षात्काराच्या वेळी, निर्वाणाच्यावेळी ते आपल्याकडे लक्ष पुरवितात. कारण उत्सर्जनासारख्या इतर सर्व क्रिया तुम्ही नव्या जगतात जात असतांना ते थांबवितात. एकदा मी १८ तास एकदांही न उठता, एका जागी, बसले आहे. कुंडलिनीचं उत्थान होत असतांना या सर्व क्रिया थांबतात व तुमच्या मेंदूत ती सूज्ञता येते. एकदां ती सूज्ञता आली कीं, सर्व वाईट संवयी, चूकीची गुंतवणूक, सर्व अधार्मिक गोष्टी, गळून पडतात. तुमचं जेनेटिक्स बदलतं. सहजयोगींचे जीन साधारणसारखे असतील, इतर लोकांचे जेनेटिक्स वेगळं असेल, भारतीयांचं जवळजवळ सारखं असतं कारण, सामान्यतः ते अतिशय सूज्ञ लोक असतात. पाश्चात्य देशांतली मूलं शाळेत गेल्यावर फार विध्वंसक गोष्टी करत होती, एकदां त्यांनी घाणेरड्या तळ्यांत उड्या मारल्या आणि त्यांना मलेरिया झाला. शाळेतून बाहेर पळून रस्त्यावर, नाहीतर दुकानांत गेली, सूज्ञ मूल फार सावधगिरीने वागतं आणि स्वतःच्या आयुष्याचं महत्व त्यांना माहित असतं. त्यांचे पालक व इतरांना आपोआप ही मुलं मान देतात. धर्म आपोआपच समजतो.

श्री गणेशांनी ख्रिस्तांचं रूप घेतलं, परमेश्वर म्हणून तुम्ही सर्वांनी त्यांचा स्वीकार केला. पाश्चात्य देशांमध्ये तुमचं गणेश तत्व जास्त विकसित झालं नसल्याने, लोक पोर्नोग्राफीच्या बीभत्सतेकडे वळले. विवस्त्र स्त्री विषयी त्यांच्यामध्ये असणारं आकर्षण त्यांना सूज्ञता नाही किंवा, त्यांच्यामध्ये गणेश नाहीत हेच दर्शवितं. ख्रिस्ताचे ते अनुयायी असले तरी, चर्चला जाणं म्हणजे फक्त तोंडदेखलंच आहे. आणि चर्च तिथे ते कसं जीवन व्यतित करतात, त्यांमध्ये पावित्र्याचा, मांगल्याचा लवलेशही नसतो. सूज्ञता आल्याबरोबर तुम्हाला पावित्र्य मांगल्य समजू लागतं, मुलांना मूलतःच अबोधिता प्राप्त असल्याने, 'आम्हांला मुलांसारखं कर' असं गणेशांना सांगायला हवं, सर्व मुलं नव्हे, पण, ज्या मुलांमध्ये गणेशांनी सूज्ञता घातली आहे, ती मुलं. अंतर्यामी शक्ति नसल्याने तुम्ही चूक होऊ शकतां. तुम्हाला आंतमधून सूज्ञ व्हायला हवं. सहजयोगी कसे काय वेगळे आहेत, ते तुम्हाला दिसू शकतं. त्यांची वर्तणूक, उभं राहणं, बोलणं, विचार, वेगळे असतात, पहिल्यांदा ते मद्य प्राशन करीत होते. धुम्रपान करीत होते, अंमली पदार्थाचे सेवन करीत होते, पण एकदम ते बदलले. त्यांचं कारण श्री गणेशांनी त्यांच्यामध्ये सूज्ञता घातली आहे.

त्यांचं चरित्र फार चित्तवेधक आहे. ते एक बालक आहेत. आणि या आईला पूर्णपणे समर्पित. दुसरा कोणताही देव त्यांना माहित नाही वगैरे. पण आपण तसे आहोत कां? कांही सहजयोग्यांमध्ये प्रामाणिकपणाचा अभाव आहे. ते अजून कडेलाच आहेत. आणि त्यांना आणखी वर उठायचं आहे. सहजयोगाने त्यांना कितीतरी दिलेलं आहे. आपण सहजयोगाविषयी प्रामाणिक आहोत कां? आपण शोधलं पाहिजे,

सहजयोगांसाठी आपण काय करतो? कांही सहजयोगींची सहजयोगावर जबाबदारी पडते. गणेशाची कधीही आपल्या आईवर जबाबदारी नसते.

उदा. कोणी आजारी पडलं तर, सहजयोग तुम्हाला मदत करू शकतो. तुम्ही बरे व्हाल किंवा नाही, जर ते बरे झाले नाही तर, ते कुरकुर करतात आणि सहजयोग सोडून देतात. त्यामुळे आपल्याला म्हणावं लागतं, 'कृपा करून सोडा'', काय महत्वाचं आहे, ते न जाणतां लहानशा गोष्टीमुळे ते निघून जातात. दुसरी जबाबदारी होते, ते जेव्हां विवाह करतात त्यावेळी, ''ही पत्नी मला आवडत नाही'' पती आणि पत्नी सहजयोग करीत नाही. मी काय करूं? तुम्ही स्वतःच तुमचे प्रश्न सोडवा. ते करण्याची शक्ति तुमच्याकडे आहे. संयम ठेवा. ते करून टाका. ते आम्हाला खटल्यांत अडकवितात वगैरे. फक्त सहजयोगीच सहजयोगाला त्रास देऊ शकतात, जो पर्यंत, एखादा सहजयोगी अयोग्य वर्तन करीत नाही, तोपर्यंत सहजयोगाला कोणीही हातसुद्धां लावूं शकत नाही. त्यांनी चमत्कार पाहिले आहेत. फायदे पाहिले आहेत, मदत झालेली पाहिली आहे पण, अचानक ते म्हणतात, आम्हांला सहजयोग सोडायचा आहे. त्यांनी तो सोडावा. नाहीतरी स्वर्गात फार थोडी जागा आहे. आणि अशा अर्धवट लोकांसाठी जागा नाहीच.

नुसती बाहेरुन श्रीगणेशांची उपासना करूं नये. तुमच्या आंतमध्ये काय आलंय तो महत्वाचा मुद्दा आहे. श्री गणेशाचं तुम्ही त्याच भक्तिने, समर्पणाने अनुसरण करतां का? श्री गणेशांच्या धर्तीवर तुम्हाला घडविलं आहे. निष्कलंक गर्भधारणेने श्री गणेशना घडविलं होतं. तुम्हालांही त्याचप्रकारे बनविलं आहे. तुमची कुंडलिनी चढविली होती. तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला होता. तुम्हाला तुमचा दुसरा जन्म मिळाला, पित्याशिवाय या सर्व गोष्टी तुमच्या बाबतीत घडल्या. तुमच्यामध्ये कांहीतरी असलं पाहिजे, त्याशिवाय मी तुम्हाला घडवूं शकले नसते. तुमच्या आत्मसाक्षात्कारांसाठी तुम्ही परिपक्व होता आणि, खरोखरच त्याला शोधित होता. सहजयोगी बनण्याची तुमची इच्छा होती. ज्यावेळी वाढ होत असते तेव्हां, तुम्ही निरीक्षण केलं पाहिजे. आणि आपण किती प्रामाणिकपणे, किती समर्पणाने आपण करीत आहोत ते पाहिलं पाहिजे.

काल वादळ होतं, तुम्ही गाणी म्हणूं लागल्यावर वादळ थांबलं. केवळ गाण्याला किती शक्ति असते, हे दाखविण्यासाठी हे झालं. अशा गोष्टी घडल्या नाहीत तर, या गाण्यांना इतकी शक्ति असते हे तुम्हाला कसं कळणार? ही गाणी मंत्र आहेत. सर्व जागृत गाणी, मी कांही सूचना दिल्या नाहीत, तुम्ही स्वतःहून गाऊ लागलात. जर प्रत्येकवेळी मला सूचवायचं असेल तर, तुमची शक्ति तुम्ही कधी वापरणार? ही श्री गणेशाची क्लृप्ती आहे. तुमच्यासाठी खरे परिक्षक ते आहेत. जेव्हा तुम्हाला बाहेर टाकलं जातं, त्यावेळी परत येणं फार कठीण असतं. जरी तुम्ही परत आलांत तरी, स्वतःबद्दल तुम्हाला शंका असते आणि इतरही तुमच्या विषयी संशयित असतात. ही न्यायनिवाड्याची वेळ आहे, हे तुम्ही जाणलं पाहिजे, आत्मपरिक्षण करा आणि शोधून काढा. मी सूज्ञ आहे कां? ''मी सूज्ञतेच्या सारासार विचार करून गोष्टी करीत आहे कां?'' प्रत्येक ठिकाणी आत्मपरीक्षण करा ''मी ते केलं पाहिजे की नाही''?

तुमचं प्रेम तुम्हाला व्यक्त करायचं आहे. पण इथे प्रेम संलग्न नाही. पण अलिप्त आहे. जिथे ते जास्तीत जास्त वाढू शकतं. आणि ही सर्व जबाबदारी पेलूं शकतं इतर सहजयोग्यांवर टीका करणारे लोक आहेत. अत्यंत खालच्या दर्जाच्या सहजयोग्याची ती खूण आहे. कारण स्वतःमध्ये काय चूक आहे ते, तो पहात नाही. दुसऱ्या प्रकारचे सहजयोगी आहेत, ज्यांना, ते गणांसारखे आहेत याचं आकलन झालेलं नाही. गण अत्यंत जलद असतात. श्री गणेश गण निर्माण करतात. पहिल्यांदा ते स्टर्नम छातीच्या या अस्थिमध्ये असतात. मग ते सर्व शरीरांत जातात. जेव्हां मध्य हृदय, आईचं स्थान, थोडसं व्हायब्रेट होऊ लागतं, स्पंदन पावू लागतं, तेव्हां ते दक्ष होतात. आपल्याला दक्ष असलं पाहिजे, ते फार महत्वाचं आहे. तुमच्या वयाच्या बारा वर्षापर्यंत हे गण स्टर्नम अस्थींत रहातात मग ते पूर्ण शरिरामध्ये पसरतात. शत्रूला तोंड देण्यासाठी परिपक्व होईपर्यंत ते असतात. कोणत्या प्रकारचे शत्रू आहेत, ते त्यांना माहित असतं. आणि कोणी कोणाला तोंड द्यावं ते, ते ठरवतात. पण ते सतत आईच्या घरांत बसून रहात नाहीत. आपण लोकांकडे गेलं पाहिजे, आपण विराटाच्या शरिरांत गेलं पाहिजे, स्वतःमध्ये कांही भिती न ठेवतां, तुम्हाला सर्व सिद्धतेने गेलं पाहिजे, त्यांच्याशी लढा केला पाहिजे, रडत, अश्रू पुसत घरी बसतां नये. बुद्धाच्या जीवनांत तेच लिहिलं आहे की, ते मैत्रेय बनतात. म्हणजे त्यांच्यामध्ये तीन माता असतात. ते सुद्धा समाजात जातात. लोकांचं परिवर्तन करतात.

तुम्ही जेव्हां गुरुपदासाठी विचारणा केली, त्यावेळी तुम्ही अडचणीत येणार, हे तुम्हाला माहित नव्हतं. गुरु घरी बसत नाही. तो बाहेर जातो, सर्व प्रकारच्या लोकांना भेटतो. त्यांना सहजयोगाविषयी सांगतो. घाबरुं नका, तुम्हाला समाजांत रहायचं आहे. तुमच्या स्वतःच्या प्रश्नामध्ये गुंतून रहायचं नाही, किंवा नुसता सहजयोगीच्या किंवा सहजयोगाविषयक प्रश्नांत अंतर्भूत व्हायचं नाही तर बाहेर जाऊन इतर लोकांना भेटायचं आहे. त्यांना सहजयोगाबद्दल सांगायचं आहे, बॅचेस घाला, म्हणजे लोक विचारतील, हे कोण आहे? तुम्ही त्याविषयी त्यांच्याशी बोलू शकाल. तुम्हाला कशाचाही त्याग करायला नको. या वेगवेगळ्या जागांवर जाऊन त्यांना दाखविलं पाहिजे. तुम्ही काय करता, त्याविषयी लिहिलं पाहिजे, आजूबाजूला काय चाललं आहे, ते तुम्हाला कळलं पाहिजे बातमी वाचा, टी. व्ही. बघा, कारण, आंता तुम्ही परिपक्व झाला आहात. पण तुमच्या परिपक्वतेच्या आधी नाही. कारण, नाहीतर टी. व्ही. वाल्या लोकांसारखे तुम्हीही वेडे व्हाल. अलिप्त मनाने तुम्ही टी. व्ही. पाहिलात तर, ताबडतोब तुम्हाला मुद्दा काय तो कळेल, नाहीतर, तुम्ही घरांत बसून मातजींसाठी रडत रहाल. गणेश या गणांना शक्ति देतात आणि ते लढतात. म्हणून त्यांना गणपती म्हणतात. तुमच्या देशाचे कांही नियम इतके भयानक आहेत, त्याविषयी तुम्ही लिहिलं पाहिजे, आतां निश्चयपूर्वक स्वतःचं सांगणं मांडण्याचा प्रयत्न करा.

जोपर्यंत तुम्ही ते करत नाही, तोपर्यंत सहजयोगांत कोणी येणार नाही. कदचित त्यांच्यामधून तुम्हाला खूप महान लोक मिळतील. हे खोटे गुरु या मोठ्या लोकांना फार मोठी मोठी पत्रं लिहितात. त्यानंतर त्यांची मुलाखत मिळवितात. मग त्या लोकांना जाऊन भेटतात. मग स्वतःची पुस्तकं वगैरे दाखवितात. तुम्हाला त्यांना आमंत्रण द्यायची असतात नाहीतर, ते येत नाहीत. गणेशाचे गण म्हणून तुम्हाला हे विशेष काम केलं पाहिजे. आता तुम्ही परिपक्व झाला आहांत. तुम्हाला समाजात जायला पाहिजे, तुम्हाला संगीत सभा घेता येईल, ती जरी "पॉप" स्टाईलची असली तरी संदेश स्पष्ट हवा. शब्दनशब्द स्पष्ट हवा. त्यासाठी आपल्याला पूर्णतः परिपक्व झालेले लोक हवेत नाहीतर क्षुल्लक कारणास्तव ते उत्तेजित होतात आणि भांडू लागतात.

आणि आपण बुद्धिवान आहोत, हे समजू शकत नाही. असेही आपण म्हणतां नये. तयारी करा. आपण सेमिनार किंवा क्लासेस देखील काढू शकतो. तिथे ह्याची चर्चा होईल. पुजेच्या वेळी एक प्रकारची परिषद किंवा चर्चा होऊ शकते. आतां वेळ आली आहे आणि तुम्हाला पुढे आलं पाहिजे, आत्मसाक्षात्कार घेतल्याशिवाय तुमच्या अनुवंशिकतेचे प्रश्न सुटणार नाहीत. वैयक्तिक प्रश्नांच्या बाहेर या सर्व गोष्टींविषयी अलिप्त दृष्टीकोन पाहिजे. आणि कुठलीही बांधीलकी नको. तरच तुम्ही स्वतंत्र व्हाल. पण त्याचा अर्थ असा नाही की तुमचं कर्तव्य करू नका, हवं ते पोषण करूं नका. प्रत्येकाला प्रेम द्या, त्याची कदर करा. पण जिव्हाळा बाळगूं नका. जर तुमचं व्यक्तिमत्व परिपक्व असेल आणि तुम्ही अर्थपूर्ण दृष्टीने पहात असाल, तर तुम्ही म्हणाल "मला सहजयोग केला पाहिजे, ते माझं मुख्य कार्य आहे, तुम्हाला समजलं पाहिजे की, तुम्ही सर्वसामान्य दिसला तरी, देवाने तुम्हाला निवडलं आहे, तुम्ही सहजयोगाचं कार्य केलं नाही, तर दोष कोणाला येईल? मला तुमच्याकडून पैसा किंवा इतर कांही नको. पण अर्थात पैसा जिथे लागतो, तिथे तुम्ही कांहीही करून पैशाची मदतही केली पाहिजे, लोक शर्यतीवर दारुच्या गुत्यांवर पैसे लावतात. दुसरी गोष्ट, लोक विचारतात, हे एवढं महाग कां, असं कां नि तसं कां? सहजयोगांत प्रत्येकाला अकाऊंटस कळतात, आणि येतात. कांहीही लपवलेलं नसतं. पैसा कुठे जातो वगैरे. मला सहजयोगाची गरज नाही. एक तुम्ही आहांत ज्यांना सहजयोगाची गरज आहे.

मी कोण आहे माहित आहे कां तुम्हाला? गणेशांना माहित होतं. एकदा, त्यांचे वडील म्हणाले पृथ्वीभोवती जो कोणी प्रथम प्रदक्षिणा घालेल त्या व्यक्तिला मी बक्षीस देईन, त्याचा दुसरा भाऊ कार्तिकिय, त्यांचं वहान मोराचं. गणपतीचा नुसता छोटा उंदीर, त्यांनी विचार केला, माझ्या आईपेक्षां कोण महान आहे. ती सर्वात महान आहे. ही पृथ्वीमाता वगैरे काय आहे? ती कितीतरी पृथ्वीमाता तयार करू शकते. म्हणून ते नुसते तिच्याभोवती फिरले. मी महामाया आहे. मला तुम्ही पूर्णपणे जाणूं शकत नाही. कारण, नाहीतर, तुम्ही इथे बसणार नाही. पण तसं असलं तरी गणेशांनी त्यांच्या आईला समजून घेण्याचा प्रयत्न केला, तसा प्रयत्न करा. निःशंकतः ते कठीण आहे, पण तरीही प्रयत्न करा. ही तुमच्यापुढे बसलेली शक्ति आहे. आपण कसे वागतो, बोलतो, कशाप्रकारे निर्णय घेतो, ते सर्व अयोग्य आहे. हे जर तुमच्या मेंदूत शिरलं नाही तर त्याचा अर्थ कुंडलिनी तिथे आली नाही. लोकांना एका व्यक्तिचीही कुंडलिनी वर चढवता येत नव्हती, आतां मी नुसती कुंडलिनी चढवते. इतकंच नाही तर तुम्हीसुद्धां ते करू शकता, अध्यात्माच्या इतिहासामध्ये ते कोण करूं शकत होतं.

मी मानवासारखी वागते, हसते, चुटके सांगते हसते, पण त्याचा अर्थ तुम्ही स्वातंत्र्य घ्यावं असा नाही. श्री गणेश हे एक सर्वात जास्त कडक देव आहेत. ख्रिस्ताने सूचना दिली आहे, "माझ्याविरुद्ध कांहीही मी सहन करेन पण, होली घोस्ट (आदिशक्ति) विरुद्ध नाही. लोकांना शिक्षा मिळते. श्री गणेशांच्या हातांत परशु आहे जो तुम्हाला माहित नाही. तुम्हाला जो कोणी त्रास देण्याचा प्रयत्न करेल, त्याला त्रास होईल, पण तुमच्या शक्त्यांवरचा विश्वास कुठे दिसत नाही. अंधविश्वास नव्हे, आलोकित विश्वास, प्रकाशित विश्वास जर असेल तर, लंडन विमानतळावर काम करणाऱ्या माणसासारखा असेल. तो चांगला माणूस होता, तीन लोक त्याला त्रास देत होते, तो त्यांना ह्याला त्रास न देण्याविषयी बजावत राहिल, पण ते कांही ऐकत नव्हते, दुसऱ्या दिवशी त्याच तिघांची अचानक नोकरी गेली आणि अजूनपर्यंत त्यांना नोकरी मिळाली नाही.


तुमच्याकडे प्रचंड शक्त्या आहेत हे तुम्हाला कळलं पाहिजे, नुसती प्रार्थना करा, "श्री माताजी, मला ही व्यक्ति बरी व्हायला पाहिजे" त्या व्यक्तिला तुम्हाला हात लावायची गरज नाही, तो तुमचा विश्वास आहे. इतर सहजयोगी असतांना एखाद्या सहजयोगीला त्रास कां व्हावा? मी आतां कोणाला बरं का करावं? तुमच्या प्रार्थना देखील इतक्या शक्तिशाली आहेत, नुसती प्रार्थना करा. तुमच्या हातांत पाश आहेत, कोणीही तुम्हाला त्रास देऊ शकत नाही. इतरांना आशिर्वाद देणारा तुमचा हात आहे. तुमचा उदारपणा तुम्ही सुरु करा. आणि पहा, लक्ष्मी वाहू लागते, पण, प्रत्येक, बारीकसारीक गोष्ट तुम्ही मोजली तर संपलंच. श्री गणेशांना माहित होतं त्याप्रमाणे तुमची शक्ति नीटपणे जाणा, त्यांना कधी कदर केली नाही, हत्तीच्या डोक्याने देखील त्यांनी इतक्या गोष्टी केल्या, मानवी शीरांनी तुम्ही जास्त चांगलं नियमन करू शकता.

श्री गणेशांची दुसरी गुणवत्ता म्हणजे ते संतुष्ट व्यक्ति आहेत. ते मोदक खातात, कांहीतरी भरपूर त्यामध्ये सर्व सुकामेवा असलेलं, काही तरी खातात. खायला कांही देऊन तुम्ही त्यांना प्रसन्न करून घेऊ शकता, माझं त्याउलट आहे, मी जास्त खाऊ शकत नाही, आणि तुम्हाला मला द्यायचं असतं. जे कांही तुम्ही खातां त्यावेळी त्यांचा विचार करा. श्री गणेशा हे मी तुला देतो. तुम्हाला कधीच अन्नाची टंचाई भासणार नाही. जसं, त्या दिवशी गरम होतं तुम्हाला थंड हवं होतं. तुम्ही डावीकडून उजवीकडे घेतली आणि श्री गणेश वर आले, मुसळधार पाऊस पडला इतका की, आटलेले झरे देखील भरले त्यांनी तुमची परिक्षा घेतली, इतक्या वादळात एक छोटा तंबू सुद्धा उडून गेला नाही ती मजाच

झाली, इतरांसाठीसुद्धा तुम्ही परीक्षेचं मैदान आहांत ताबडतोब तुम्हाला कळेल ही कशाप्रकारची व्यक्ति आहे, तुमच्या शक्त्या वापरा, पण तुमचं चित्त दुसरीकडे असेल तर ते पवित्र नाही. श्री गणेश आणि मी यांच्यात चित्त ठेवा, सर्वकांही कार्यान्वित होईल, तुमच्यासाठी हे गण इथे आहेत सारं कार्यान्वित करीत आहे, तुमचं चित्त अशा प्रकारे ठेवा की तुम्ही जाणता तुम्ही दक्ष असाल, तुम्ही नुसते ग्रॅज्युएट्स नाहीत, मास्टर्स, आहांत, नाहीतर तुम्हाला गुरुपदांसाठी मी विचारलं नसतं. तर, तुमच्या प्रभुत्वाचा उपयोग करा. अजून तुम्ही घरीच बसला आहात, माझे वडील आजारी आहे, असं म्हणत. मग जा आणि त्यांना बरं करा. पुरुष आणि स्त्रिया दोघंही प्रभुत्व मिळवत आहेत, छोट्या गोष्टींत गुंतण्यापेक्षा वर उठा.

श्री गणेशांची दुसरी गुणवत्ता म्हणजे, त्यांचे दांत ते लिहायला वापरतात, दांत तुम्हाला श्रीकृष्णापासून येतात, त्यांनी महाभारत दांताने लिहिलं. श्रीकृष्णांच्या प्रकाशितेने तुम्हाला तुमचा मेंदू वापरला पाहिजे आणि लिहिलं पाहिजे, त्यातुन पुस्तकरूपाने तयार केलं पाहिजे, लोक पुस्तकं वाचतात, प्रभावित होतात, तुम्ही नाटकं करू शकतां, टी. व्ही. वगैरेकडे जा लोकांप्रत कस पोहोचायचं त्याचा विचार करा. समाजात जा, तुमच्याकडे असलेलं त्यांना द्या. ते तुमचं कर्तव्य आहे, आणि तुमचा विशेष हक्क आहे.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.



# गुरुपुजा

## लॉज हिल परिवार, इंग्लंड, २४/७/१९८३

तुमची गुरुपुजा करण्यासाठी आज आपण सगळे इथे जमलो आहोत. गुरु हा पहिल्यांदा आई असतो, आणि नंतर गुरु आणि त्यामुळे मला खूप मदत झाली आहे.

या आधी सुद्धां आपण अनेक गुरुपुजा केल्या आहेत. विशेषतः इंग्लंडमध्ये. श्रीमाताजी कसंही करून नेहमीच लंडनमध्येच कशा काय गुरुपुजा करतात, याविषयी तुम्हाला आश्चर्य वाटत असेल.

गुरुपुजेची वेळ अशाप्रकारे येते की, त्यावेळी मला लंडन मध्ये असावंच लागतं. कितीतरी वर्ष इंग्लंडमध्ये तुम्ही गुरुपुजा करीत आहांत. जर ऋतंभरा प्रज्ञेनुसार साऱ्या गोष्टी होत असतील तर, श्री. माताजी इथे, इग्लंडमध्ये गुरुपुजेच्यासाठी असण्याचंही कांही कारण असलं पाहिजे.

तमसा नदीच्या तीरावर आदिगुरु दत्तात्रेयांनी आईची आदिशक्तिची उपासना केली, असा पुराणांत उल्लेख आहे. तमसा म्हणजेच तुमचे "थेम्स" आणि ते स्वतः इथे आले, त्यांनी उपासन केली. आणि "ड्रुइडस" (औषधे देणारे) ज्यांनी पाषाणशिला (स्टोनहेंजेस) उभारले ते त्या काळापासून या शिवाच्या महान देशांत, आत्म्याच्या महान देशांत होते.

तर आत्मा, मानव प्राण्याच्या ह्रदयामध्ये, तसेच इथे सुद्धा वसतो, आणि हिमालयामध्ये सहस्त्रार आहे, जिथे, कैलासामध्ये सदाशिव रहातात. इतक्या अनेक गुरुपुजा इथे होण्याचं मोठं गुपित हे आहे. श्री. माताजींच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त या वर्षी, आज, इथे होणारी ही विशेष गुरु पुजा म्हणजे त्याची पराकाष्ठा आहे. याचं फार फार मोठं विशेष महत्व आहे. कारण गुरुसष्ठी म्हणजे, तुमच्या गुरुची साठ वर्ष झाल्याचा सोहळा आज होत आहे आणि त्याप्रसंगी परत, ऋतंभरा प्रज्ञेच्या प्रभावांतच तुम्ही सगळे इथे जमला आहांत.

तर जे कांही झालं आहे, ते निसर्गाची स्वतःची देणगी म्हणून तुम्हाला मिळालं आहे. सगळं इतक्या चांगल्या तऱ्हेने कार्यरत झालं आहे कारण, ती देवाची इच्छा होती आणि देवाची योजना तशी होती.

तर, थेम्स नदी, आपण तिला "थेम्स" म्हणतो, असं बघा, इंग्रजांची ही एक पद्धत आहे, सारं कांही करण्याची. जसं बॉम्बे-मुंबईला, त्यांनी बॉम्बे करून टाकली, पहा कलकत्ता, त्यासारखेच सगळे शब्द. वाराणसीचं बनारस करून टाकलं, थेम्स नदी, जी खरी तर "तमसा" होती, तिला थेम्स. आतां तमसा नांवावरुन तुम्हाला कळलं, ते तमोगुणाचं स्थान आहे. ती अशी जागा आहे, जिथे बऱ्याच काळापासून डाव्या बाजूचे लोक रहात आहेत.

तर, हे लोक खूप उपासना करणारे, डाव्या बाजूकडचे भावनिक स्वरुपाचे लोक होते. आणि यज्ञ करणे वगैरेंपेक्षा, ते देवाची भक्ती, उपासना जास्त करत होते. आणि इथे श्री. दत्तात्रेय रहायचे, त्यांनी इथे ध्यानधारणा केली, या थेम्स नदीच्या तीरावर. म्हणूनच, तुमच्या गुरुतत्वाची जागृति होण्यासाठी इथल्या गुरुपुजेने आपल्याला एक महान पार्श्वभूमि दिली आहे.

प्रत्येक गोष्टीचं महत्व समजण्यासाठी आपल्याला तिच्या मूळापाशी जायला हवं. त्याची मूळं, त्या मागची परंपरा समजल्याशिवाय कोणत्याही पुजेची गहनता, त्यांचं गांभीर्य, तीव्रता यांचं तुम्हाला आकलन होणं शक्य नाही. आज आपण इथे गुरु पुजा करण्यासाठी एकत्र झालो आहोत. परत, कारण काय आहे, गेल्या वेळी ती तुम्हाला सांगीतल्याप्रमाणे आपल्यामध्ये गुरुत्व आहे आणि आपल्यामध्ये प्रकटीत झालेल्या दहा आज्ञा, ज्या आपल्यामधील वेगवेगळी तत्वं विशद करतात ते सुद्धा अत्यंत तपशीलवार रीतीने मी तुम्हाला सांगीतले आहे. गुरुपुजेचं तत्व आपल्यामध्ये जागृत केलं पाहिजे, म्हणून, इथे, हा समारंभ आपण करीत आहोत.

आतां आपल्यामध्ये "धर्म" प्रस्थापित करणं महत्वाचं आहे. धर्माशिवाय तुमचं उत्थान होऊ शकणार नाही. आणि मागे मी सांगितल्याप्रमाणे, किती काटेकोरपणे तुम्ही धर्माला अनुसरता, त्यावर तुमची स्वतःची स्वच्छता अवलंबून आहे.

मोझेसच्या वेळी ते सगळं कार्यान्वित केलं गेलं आणि आत्मसाक्षात्कारी आत्म्यांसाठी नियमावली तयार करण्यांत आली. पण आता मी जे एका पुस्तकांत वाचते आहे, हे फार चांगलं आहे, कारण हे जर मी सांगीतलं असतं तर, लोकांनी विश्वास ठेवला नसता, की, त्यांना बदलायला हवं होतं, तर मानव प्राण्याला दिलेली ती नियमावली खरं तर, आत्मसाक्षात्कारी लोकांसाठी होती. त्यांना ती समजली असती, पण माणसं कशी आहेत, याचा जेव्हां मोझेसला शोध लागला त्यावेळी त्याने त्यांना बदलून कडक नियम केले असावेत, कारण माणसं कशी आहेत ते लक्षांत घेता, आपल्याला अत्यंत कडक शिस्तीने रहावं लागतं, त्यांना भिती शिवाय दुसरं कांहीही समजत नाही. जर तुमच्याकडे काठी असेल तर, माणूस प्राणी ऐकणार नाही, फक्त भिती असेल, तरच ते व्यवस्थिती रहातील, आतां, ज्यांच्याकडे लीडर्स किंवा पंतप्रधान किंवा राष्ट्रपती आहेत, अशा देशांची, आज, तुम्ही जर परिस्थिती पाहिलीत तर, ते सगळे लोक अतिशय कडक शिस्तीचे, फार दबाव आणणारे

फार शुष्क असे आहेत. आणि सर्वसामान्यतः लोकांना असे लोक आवडतात, या अशा स्वभावामुळे हिटलरला सुद्धां यश मिळालं.

तर, आत्मसाक्षात्कार न मिळालेल्या लोकांसाठी गुरुचा स्वभाव फार कठोर होता. सर्वसाधारणपणे, गुरु, चांगला गुरु, सत्गुरु जो असेल, त्याला लोकांशी जास्त बोलायला आवडत नाही, ते दगड फेकतात, किंवा, आत्मसाक्षात्कार न मिळालेल्या लोकांशी बोलायला त्यांना आवडत नाही. पण जर, ते आत्मसाक्षात्कार मिळालेले लोक असतील तर, ज्या लोकांना त्यांना भेटायचं असतं, त्या लोकांविषयीचा दृष्टीकोन हे गुरु बदलतात देवाच्या नियमांनुसार आत्मसाक्षात्कार मिळालेली व्यक्ति व तो न मिळालेली व्यक्ति यांमध्ये महदंतर असतं. ती व्यक्ति राजा असेल किंवा आणि कोणीही त्याला बाहेर बसायला सांगण्यांत येतं. तुम्ही कोणत्या स्थानावर आहांत, त्याच्याशी त्यांचा कांहीही संबंध नसतो, जोपर्यंत तो आत्मसाक्षात्कार असतो आणि त्याला कांहीही बाधा नसतात, तो पर्यंत त्याला सर्वोच्च स्थान दिलं जातं, पण तुम्हाला जर बाधा असतील, तरी सुद्धां गुरु सांगेल की, तू इथून निघून जा, प्रथम तुझ्या बाधा स्वच्छ कर, आणि मग ये.

आणि हे सर्व कडक नियम तिथे होते की, अशा अशा व्यक्तिला ठार केलं पाहिजे, अशा व्यक्तिला हात तोडून टाकण्याची शिक्षा देण्यांत यावी, पाय तोडण्याची, अगदी डोळे फोडण्यापर्यंत.

हे करण्यांत येत होतं कारण ते, आत्मसाक्षात्कारी लोक नव्हते तेव्हां, मला वाटतं हा मोझेसचा महान साक्षात्कारच असावा की, त्याने आतां "शरायत" म्हणून जाणला जाणारा, वेगळ्या प्रकारचा नियम अंमलांत आणला. आणि मुसलमान आता त्याचंच अवलंबन करीत आहेत. एक प्रकारे मला वाटते, ते चांगले आहे कारण, जे "नॉर्मल" सर्वसामान्य लोक आहेत, त्यांना खरोखर तो शोभतो, पण तो इतका अतिरेकी असतां नये, ज्यामुळे आत्मसाक्षात्कारी व्यक्तिमध्ये फारकत व्हावी.

आतां स्वतःच्या बाबतीत तुम्ही कडक शिस्त राखली, तर तुमच्यामधील गुरु जागृत होईल. तो एक मुद्दा फार महत्त्वाचा आहे. स्वतःविषयी कडक शिस्त राखल्याशिवाय तुमच्यामधील गुरु जागृत होणार नाही, जे लोक आळशी आहेत, कशाचाही त्याग करूं शकत नाहीत, ज्यांना सुखसोयींची अतिशय आवड आहे, ते कधीही गुरु बनू शकणार नाहीत. मी सांगते तुम्हाला. ते चांगले व्यवस्थापक बनू शकतील, कांहीही होऊ शकतील पण गुरु कधीच नाही. त्याला ज्याप्रकारे जगावं लागतं, त्याप्रकारे जगण्याची त्याची इच्छा हवी, त्याला दगडांवर झोपता आलं पाहिजे, कोणत्याही परिस्थितीत त्याला झोपता आलं पाहिजे, शिष्य त्याच्यावर लादले जातां नयेत. तर तो त्याचा स्वतःचा स्वभाव पाहिजे, त्याला स्वतःला जुळवून घेता आलं पाहिजे. गुरुवर सुखसोयींचा वर्षाव होत नाही, ज्यांना गुरुतत्वाची जागृति करून घ्यायची आहे, त्यांना कळलं पाहिजे की, त्यांनी सुखसोयींबाबत विचारणा करता नये, त्याची गोष्ट देखील काढतां नये, काल तुम्ही नृत्य पाहिलंत, खरी तपस्या करावी लागते, व्यक्तिला खरी तपस्या करावी लागते, तीव्र तपस्या. तप न करता नृत्यासारखी गोष्ट तुम्ही शिकूं शकत नाही.

तर, गुरुला तपस्या करावी लागते, ही महत्त्वाची गोष्ट आहे. सहज योग्याला ती करावी लागत नाही. पण गुरु सहजयोग्याला ती करावी लागते. तपस्या अशी असू शकते, जी कांही तुम्हाला इच्छा असेल, समजा, तुम्हाला अन्न खूप आवडतं, जे अन्न तुम्हाला खावंसं वाटतं, ते खाऊ नका, तुम्हाला गोड फार आवडत असेल, तर कांहीतरी १०८ पट कडू खा, जर तुम्हाला भारतीयांसारखे मसालेदार जेवण आवडतं असेल तर, बिनमसाल्याचं अळणी जेवण जेवा, तुमच्या जिभेला नीट वागायला शिकवा, अन्नावर चित्त ठेवणं गुरुला शोभत नाही, मी कांही सहजयोग्यांना पाहिलं आहे, अन्न असेल त्यावेळी त्याचं चित्त नीट एकाग्र होतं पण कार्यक्रम म्हटला की, त्यांची एकाग्रता ढळते. फार खेदाची गोष्ट आहे. अशा लोक गुरु होणं शक्य नाही. ते आचारी होऊ शकतात. चांगले आचारी किंवा अन्नाची चव घेणारे किंवा तसलं कांहीतरी त्यांना चांगलं शोभेल पण त्यांना गुरु व्हायचं असेल तर, स्वतःची इच्छा आणि जीभ सांभाळायला त्यांना शिकलं पाहीजे, माझ्या मते, त्याचा अर्थ अशा लोकांना उपास चांगला. सदैव त्यांना हीच चिंता असते "आपल्याला दुपारच्या जेवणाला काय मिळणार आहे" रात्रीच्या जेवणाला काय मिळणार आहे, अशा लोकांच्या गुरुतत्वाची जागृति त्यांना मिळणार नाही. तर कृपाकरून काळजीपूर्वक वागा. गुरुचा जिभेवर ताबा असला पाहिजे, कधी रागवायचं, कधी हळूवार बनायचं, ते त्याला कळलं पाहिजे, काय बोलायचं, किती बोलायचं, ते त्यांना समजलं पाहिजे, म्हणूनच कांही न बोलल्यामुळे कांही गुरु जास्त प्रभावी झाले आहेत. "मौन" ही इतरांना मदत करण्याची सर्वात चांगली पद्धत आहे. पण जेव्हा सहजयोग समजावून सांगण्याची वेळ आली की, त्यांना सहजयोगाची कांही माहिति नसते. तर, तुम्हाला जर गुरु व्हायचं असेल तर, तुम्हाला सहजयोगाचं प्रभुत्व मिळवायला हवं. फक्त बोलण्यांतच नव्हे, तर वागण्यांत, सर्वच बाबतीमध्ये आणि करामतीतही मोहक. ते त्याला "कॅरीस्मॅटीक" म्हणतात. कशा प्रकारे करायचं ते कुंडलिनी कशी चढवायची, सहस्त्रारावर कशी ठेवायची, सहस्त्रार कसं उघडायचं या सर्व गोष्टी तुम्हाला ठाऊक पाहिजेत. तुमचे ज्ञान कसं खर्च करायचं, "विनियोग" हा संस्कृत शब्द आहे.

ज्यावेळी व्यक्ति स्वतः कांहीतरी साध्य करते त्यावेळी गुरुतत्व जागृत होतं. "तो गुरु आहे," असे म्हणत अर्ध शिक्षित गुरु चालला आहे. अशी कल्पना करा, तो शेवटी शिष्यच ठरेल, तर, तुम्हाला स्वतःला स्वतःचे स्वामी व्हायला पाहिजे. पण जेव्हां गुरुतत्व आंत प्रवेश करतं तेव्हां, तुम्हाला ते इतरांना द्यावं लागतं, इतरांना ते देण्याचा प्रश्न असतो, तेव्हा इतरांना देण्यांसाठी तुम्हाला उच्च स्तरावर असावं लागतं. खूप उच्च स्तरावर असावं लागत, जर तुम्हाला पैशाचा मोह असेल, अन्नाचा मोह असेल, जीवनातील शुष्क गोष्टींचा मोह असेल तर, तुम्ही देऊ शकत नाही.

आतां त्याहून उच्चतर स्थिती साध्य करता येते, जी माझ्यामध्ये स्वाभाविकरित्या आहे, पण ती साध्य करतां येते, ती ही की, कशावरही कोणत्याही नियमांवर तुम्ही अवलंबून नसतां, म्हणजे, 'मला जेवणाची चिंता नाही', 'मी उपास केला पाहिजे' वगैरे सगळं तेव्हा संपुष्टांत येतं जेव्हां, 'तुम्ही खातां पण खाल्लं नसतं, ती स्थिती प्रत्येकाने प्राप्त केली पाहिजे. की, तुम्ही जेवला असतां, आणि तुम्हाला विचारलं तुमचं जेवण झालं कां?'' तर, "माहित नाही," तुम्ही जेवणार कां? विचारलं, तर "माहीत नाही", शरीराच्या प्रश्नाबाबत पूर्ण बेफिकीरी. ''तुम्ही कुठे झोपलांत'' 'मला माहित नाही,' 'तुम्ही काय खाल्लं ''तुम्ही काय घेणार?'' माहित नाही.

या प्रकारच्या स्थितीला अंतीम स्थिती म्हणतात, जिथे, तुम्ही पलीकडे जाता, आणि तुम्ही जे कांही करतां, ते करायचं असतं म्हणून तुम्ही करीत असता, त्याकडे लक्ष न देता, आपोआप कांहीही महत्त्वाचं नसतं पण हे अतीत होण्याआधी तुम्हाला स्वतःला सांगायला पाहिजे, ''कांहीही महत्वाचं नाही'' तो अविर्भाव आहे. म्हणताताना एक प्रकारचं नाट्य तुम्ही दर्शविता ''ओह, कांही महत्वाचं नाही'' हा गालिचा महत्वाचा नाही, मी सिमेंटवर झोपण्याचा प्रयत्न केला पाहिजे, पहिल्यांदा, तुम्हाला ते केलं पाहिजे, पण कांही वेळानंतर तुम्हाला आठवतच नाही की तुम्ही सिमेंटवर झोपला की गालिच्यावर ''मी कुठे झोपलो, मला माहित नाही'' ती 'अतीत स्थिती' ती स्थिती अनेक सहजयोग्यांना प्राप्त करून घ्यायची आहे, ज्या स्थितीत तुम्ही पलिकडे जाता.

समजा, ज्याच्यावर रागवायचं असं कोणीतरी तुमच्यापुढे उभं आहे, ठीक आहे, तुम्ही त्याला चांगलं फैलावर घेता आणि नंतर दुसऱ्या क्षणाला तुम्ही हंसत असता, तुम्ही त्या व्यक्तिवर रागवला? मला माहित नाही, मी रागवलो कां? जसं बुद्धाने एका गांवात कांहीतरी म्हटलं आणि एक भयानक व्यक्ति उभी राहिली आणि त्याला अनेक गोष्टी म्हणाली, आणि जेव्हां ते दुसऱ्या गावात गेले त्यावेळी तिला वाटलं, ''अरे, मी असं करायला नको होतं'' कदाचित डावी विशुद्धी असेल, त्यामुळे खाली वाकून तो म्हणाला ''मला माफ करा. मी असं असं म्हटलं ते मी म्हणायला नको होतं, मला माहित नव्हतं, तुम्ही प्रकाशित आहांत, त्यामुळे असं झालं तर आतां मला क्षमा करा," ते म्हणाले, ''कधी? कधी म्हटलं तुम्ही?'' ते म्हणाले ''त्या मागच्या गावात'' "अरे, मागच्या गावातलं सगळं मी तिथेच सोडलं आहे, मला आठवत नाही.''

ती अतीत स्थिती तुम्ही मिळवली पाहिजे तर संवेदना न होणं महत्वाचं नाही. जेव्हां ही ओळख पूर्णपणे गळून पडते तेव्हा तुम्ही 'अकर्म' स्थितीमध्ये असतां जिथे सूर्य चकाकत असतो, तो चकाकत आहे हे त्याला माहित नसतं, व्हायब्रेशन्स वहात असतात, ती वहात आहेत, हे तुम्हाला माहित नसतं. तुमच्यामध्ये ते कार्यरत झालेदेखील, आहे. तुम्हाला आश्चर्य वाटतं, तुम्ही हात वर करा, कुंडलिनी वर चढते आहे, तुम्ही कुंडलिनी चढवत आहांत, हे तुम्हाला माहित नसतं, ती तुम्ही कशी काय वर चढवतां, तुम्हाला माहित नाही, तेच आहे ते, ती स्थिती 'अतीत' तुमच्या आधीच चालू झाली आहे. पण जीवनाच्या प्रत्येक पातळीवर ती प्रस्थापित करता. प्रत्येक गोष्टींमध्ये तुम्ही पलीकडे जा. आणि ते जर तुम्ही करू शकला तर, तेच सर्वोच्च आहे. जे तुम्हाला साध्य करायचं आहे.

आतां अवतरणांच्या बाबतीत ते वेगळं आहे, उलट आहे, प्रत्येक गोष्ट उलट आहे. त्यांना तपस्या करावी लागत नाही. उपास करावे लागत नाहीत, त्यांना स्वतःला सांगावं लागत नाही. जे कांही ते करतात, ते पुण्य असतं त्यांना पुण्यसुद्धां जमवायचं नसतं, त्यांनी जर कोणाला ठार केलं तर, तो धर्म असतो, जर कोणाला मारलं तर तो धर्म असतो, ते कांहीही अयोग्य करीत नाहीत. ते पूर्णपणे निष्कलंक असता, त्यांनी जर कोणाला फसवलं, तर ते पूर्णपणे योग्य असतं, कारण उच्च साध्य साधण्यासाठी, ही छोटी छोटी साध्यं सोडून द्यावी लागतात, आपल्या दैनंदिन व्यवहारांत ते न्याय्य असतं, तुम्ही पहाल, तुमच्या देशाचं संरक्षण करतांना तुमच्यावर शत्रू धावून आला तर तुम्ही त्याला ठार करू शकता, तुम्ही त्याला फसवू शकता. चातुर्याने तुम्ही त्याला मूर्ख ठरवू शकतां. ते चालतं, कां? कारण, उच्च ध्येयासाठी छोट्या साध्यांवर पाणी सोडायचं असतं, पण अवतरणाला नेहमीच उच्चांक गांठायचा असतो, लहान ध्येयांची अवतरण बिल्कूल पर्वाच करीत नाही. त्याला गोष्टी तोलून मापून, बघायच्या नसतांत, तर्क करायचे नसतात, स्वतःला शिक्षण द्यायचं नसतं, किंवा काही नाटकं करायचं नसतं, कांही नाही. ते सगळे असतं. प्रत्येक हालचाल, प्रत्येक हालचाल त्यामध्ये लकेर असते, जी भल्यांसाठी असते, एकही हालचाल अशी नसते की जगाच्या भल्यासाठी नाही. तर अवतरण ही फार वेगळी गोष्ट आहे, ती साध्य करायची नसते, ती असावी लागते, उदा. अवरतण ''भोक्ता'' असतं, उपभोग घेणारं. ते प्रत्येक गोष्टीचा उपभोग घेतं.

निर्मिती अनेकांनी केली आहे, उदा. गालिचा हा इथे आहे, ''टर्कीचा'' गालिचा. कांही कालापूर्वी टर्किश लोकांनी अवतरणाला बसण्यांसाठी तो बनविला होता. तर ऋतंभरा प्रज्ञा, अशा प्रकारे कार्य करेल की, मी, कमीत कमी, तो बघू शकेन किंवा मला तो मिळेल, म्हणजे त्यांच्या आत्म्यांना आर्शिवाद मिळतील, म्हणजे त्यांना चांगलं वाटेल, जसं मायकेल अँजेलोने ते केलं आहे, ते पोपसाठी नाही, मी तुम्हाला सांगू शकते आणि तिथे जाणाऱ्या त्या घाणेरड्या लोकांसाठी नाही, ब्लेकने सुद्धा त्या कलाकृती, ज्यांना विवस्त्र लोक पहायचे होते त्या निरर्थक लोकांसाठी केल्या नाहीत. अवतरणाने बघावं यासाठी त्या केल्या आहेत. तशा प्रकारे त्यांना सर्वात जास्त आर्शिवाद मिळतात. कारण ते पलीकडे असतात, ते स्वतःला तर्क वृत्तीने तर्क शिकवीत नाहीत, ते तसे आपोआप येतं. जसं श्रीकृष्णांना सोळाहजार स्त्रीयांशी लग्न करावं लागलं, एक पत्नीच्या त्या कालांत, तुम्ही कल्पना करू शकतां कां? शंभर वेळा त्यांच्यावर खटला भरण्यांत आला असता, कारण हे होतं कीं, त्यांना सोळा हजार शक्त्या होत्या, आणि या पृथ्वीवर ते सोळा हजार शक्त्यांसह जन्मले आणि पंच महाभुते त्यांच्या राण्या झाली. त्यांना सभोवती ठेवण्यासाठी त्यांना काही समर्थन हवं होतं, जसे

आतां माझ्याभोवती सहजयोगी आहेत, ज्यांना मी आत्मसाक्षात्कार दिला आहे, म्हणजे, आपोआप मी तुमची आई हे प्रस्थापित झालं, पण त्यांच्यासाठी त्यांच्या सोळा हजार शक्तिंशी लग्न करण्याशिवाय दुसरा कांही उपाय नव्हता आणि त्यामुळे त्यांनी लग्न केलं. पण, ते लग्न नव्हतं जन्मभर ब्रह्मचारी होते, कारण ते योगेश्वर आहेत, आणि ब्रह्मचारी आहेत, त्यांच्याशी कोण लग्न करणार.

तर, त्यांच्यासाठी या भौतिक गोष्टी, सगळं, नाट्यच होतं, त्याला कांहीच अर्थ नव्हता, नुसतं नाटक, जी अवतरण नाही त्या व्यक्तिने तसं बनण्याचा प्रयत्न करूं नये, तो मानव प्राण्याचा अधिकार नाही, जसं रस्त्यावर उभ्या असलेल्या पोलिसाने हात उजवीकडे, डावीकडे केला तर, तुम्ही त्याप्रमाणे अनुकरण करता. पण एखाद्या वेड्या माणसाने जाऊन, उभं राहून, तसं केलं तर त्याला कैद होईल.

तर सर्वसामान्य लोकांसाठी तुम्ही सुद्धां गुरु आहांत, तुम्ही त्यांना तुमचे पाय पकडायला देता नये. फक्त अवतरणाच्या पायांना स्पर्श केला पाहिजे. इतर कोणाच्याही पायांना स्पर्श करतां नये. अर्थात, जिथे सम्याचार असतो, तिथे, जसं आमच्याकडे भारतांत आहे, वडिलांचे पाय धरतात, पण, त्याचं कारण, तुमच्या मधल्या वडिलांचे ते प्रतिनिधीत्व करतात, म्हणून आईदेखील. पण ते प्रतिक आहे, पण वास्तवांत इतर शरण जाता. फक्त अवतरणाला शरण गेलं पाहिजे. तसेच, जर कोणत्याही कलेमध्ये तुमचा गुरु असेल तर, त्याचे पाय तुम्ही धरु शकता, त्यांचं नांव घेण्यासाठी सुद्धा तुम्हाला क्षमा मागितली पाहिजे, पण कोणत्याही माणसाने तुमच्या पायाला स्पर्श करतां नये, विशेषतः सहजयोगींनी मुळीच नाही, मोठं म्हणून तुम्ही करू शकतां, ती वेगळी गोष्ट आहे पण गुरु म्हणून नाही.

ती फार भितीदायक गोष्ट आहे, एकदां तुम्ही सुरु करा. मग अनेकांचं काय झालं ते कळेल. ते नुसते सहजयोगांतून गेले.

तर तुमच्यामध्ये गुरुतत्व जागृत करण्यासाठी तुम्ही स्वतःला पूर्णतः विकसित केलं पाहिजे, आतां, गुरु तत्वांसाठी तुम्हाला स्वतःला कसं विकसित करायचं? प्रत्येकाने पाहिलं पाहिजे. मागे मी तुम्हाला सांगितल्यानुसार आपल्यामध्ये दहा तत्वं आहेत, ही सगळी दाही तत्व आपण अशा प्रकारे विकसित केली पाहिजेत की, आपण इतरांपेक्षा उठून दिसूं. काल मी तुम्हाला सांगितले, आपण जेव्हा ध्यान धारणा आणि समाधी करतो आणि ऋतंभरा प्रज्ञेचे आर्शिवाद प्राप्त करतो. मग ती पूर्ण गोष्ट वेगवेगळ्या भागांत घाला, प्रदेश किंवा भुमि मध्ये. ती तुम्ही कशा प्रकारे खर्च करतां तो मुद्दा आहे, मत्रांमधून. मंत्राने ते स्वच्छ करा. चित्ताने ते स्वच्छ करा, रोज कोणतं चक्र स्वच्छ करायचं आहे, ते तुम्हाला समजलं पाहिजे, तुम्हाला स्वतःला हे कळलं पाहिजे, कुठे प्रश्न आहे, कसं स्वच्छ करायचं, कसं दूर करायचं, ते नुसतं जमेत धरुन चालू नका, डाव्या बाजूचे प्रश्न असणारी कांही मंडळी फक्त लिंबू मिरच्या आणतील आणि विचार करतील, माताजीनी काम केलेलं आहे, मी फक्त तात्पुरतं काम करूं शकेन पण जर, तिथे पोकळी असेल तर, परत तुम्ही शोधून घ्याल, पहा, तुमच्यामधल्या या पोकळ्यामुळे तुम्हाला आणखी भूक लागते, तर ती पोकळी काढून घेणं तुमचं काम आहे, त्यासाठी तुम्हाला तुमच्या सर्व कमतरता न चुकता काढल्या पाहिजेत. तुम्हा सर्वांसाठी ते महत्वाचं काम आहे. आणि या सर्व वेगवेगळ्या प्रदेशांकडे पूर्णचित्त देण्याचा प्रयत्न करा. आणि एकदां कां तुम्ही स्वच्छ झाला की ते प्रकाशित होतील, एकदां ते झालं की, तुम्ही गुरु बनण्याच्या त्या बिंदूकडे पोहोचता. पण, तरीही, तुम्ही सतगुरु नाही, सतगुरु होण्यासाठी तुम्हाला 'अतित' स्थिती मिळवली पाहिजे.

'अतित' स्थिती अशी आहे की, एखादी व्यक्ति चांगली नसेल तर, ती तुमच्यासमोर थरथर कापेल, खोटारडा माणूस, इतरांना फसवणारा माणूस गप्प बसेल, चंचल डोळ्यांचा माणूस, स्त्रीपुरुषां बाबतीत स्वतःवर नियमन नसणारा माणूस असल्यास त्याच्या डोळ्यांत थरथरेल, कांहीजण थरथरतात, बाधा असलेले लोक बरेच थरथर कांपतील, सद्‌गुरुच्या प्रकाशांत ते सगळे उघडकीला येतील.

हे प्राप्त झाल्यावर तुम्हाला त्यांच्याशी झगडावं लागणार नाही, ते स्वतःहूनच उघडकीला येतील आणि तुम्हाला त्याविषयी कांही करायला नको.

एकदा मला सांगण्यांत आलं की, एका कुटुंबात एक अत्यंत बाधित नोकरमाणूस-बाई आहे. तर मी म्हटले, तिला काढून टाका, विमानतळावर जातांना मी त्या घरांत थांबले, आणि ती बाई नुकतीच चालत आली, आणि तिथे मोठं गटार वहात होतं, तीने मला पाहिलं आणि ती त्यामध्ये पडली, असं होतं.

एकदां मी विमानांतून प्रवार करत होते आणि समोरचा माणूस उड्या मारुं लागला, तर एका सहजयोग्याने विचारलं तुम्ही "टी. एम." चे आहांत कां, त्यांनी म्हटलं, तुम्हाला कसं कळले, हा म्हणाला, आम्हाला कळतं, असं होऊ शकतं, की, ते सगळे, असाही दिवस उगवेल की, ते तशा उड्या मारु लागतील, किंवा पायलट उड्या मारु लागेल, माझ्यासाठी तो मोठा प्रश्न आहे, दिवे सुद्धां. एखाद्या चर्चमध्ये तुम्ही प्रवेश करा आणि अचानक सगळे दिवे वर जातांना दिसतात, मोठ्या पार्टीमध्ये सुद्धा मला आढळतं, मी तिथे बसले असते, आणि अचानक सगळे येतात, बसतात आणि त्यांची भूतं गोळा होतात, ती उड्या मारुं लागतात आणि नंतर लोक बघूं लागतात कीं काय होतंय, आग लागतेय कां? तेव्हां, तुम्ही त्या स्थितीला पोहोचला कीं, तुम्हाला वादविवाद करायला नको, कांहीही नको, तुमचा डोळा वर केला तरी, ती व्यक्ति अडचणीत सापडेल किंवा कांही अहंकारी लोक असतील ते विरघळतील, पहिल्यांदा आपण गुरुचं नाटक केलं पाहिजे, साधा पोषाख करा, अत्यंत हळूवार पद्धतीने तुम्हाला वागलं पाहिजे, कारण, तुम्हाला त्यांना आकर्षित करायचं आहे, या, या, या, ...ती जाहिरातबाजी आहे, जाहिरातबाजीचं खातं. एकदा ते झालं कीं, नाटक संपलं. फार लवकर ते उघडकीला येतं आणि ते शोधून काढतात की, तुम्ही कांही चांगले नाही, नुसती नाटकं करत आहांत, एकदा नाटक करून झालं की, तुमचं खरं व्यक्तित्व

तुम्ही त्यांच्यासमोर आणू शकतां.

तर, पहिल्यांदा, तुम्ही खरोखर फार कडक, शिस्तबद्ध आहांत हे त्यांना दाखवायचं नसतं, कधीही नाही, पहिल्यांदा तुमचे सगळे मधुर गुण दाखवा, जे जास्त असेल तर, मी त्यांच्याशी जास्त हळूवारपणे वागते, मग ते आतं येतात, मग तुमची चक्र चालू होतात, आणि तुम्ही त्यांना बरे करू शकता. पहिल्यांदा त्यांना तयार करा, कधी कधी, पहिल्यांदा, त्यांना इतकी भिती वाटत असते, ते इतके बेचैन असतात, इतके अस्वस्थ असतात, कधी कधी फार जास्त अहंकार असतो, तर, म्हणून शांत, हळुवार बना, क्रमाक्रमाने तुमच्या सान्निध्यांतही ते बलवान होतील आणि नंतर, तुम्ही त्यांना मारलं तरी ते ठीक राहतील.

अशा प्रकारे ते करायचं असतं, अत्यंत हुषारीने आणि मी ज्याप्रकारे माझं गुरुपद संभाळत आहे ते तुम्ही पहाल, तर तुम्ही सुद्धा तसं करू शकाल, पण गुरुची किल्ली आहे "सोशिकता" संपूर्ण सोशिकता, पहिल्यांदा हे असं हवं, असं तुम्ही त्यांना सांगता, पण ते स्विकार करत नाहीत, ते वादविवाद करतात, 'कसं? कां? हे आणि ते "ठीक आहे" जा पुढे? मग ते डोळ्याला, नाहीतर नाकाला दुखापत करून घेऊन परत येतात, मग तुम्ही म्हणता, ठीक आहे, ते बसेल, पण तुम्ही त्यावर फुंकर घालता, आणि नंतर त्यांना सांगता.

तसंच ज्ञान आहे, योगेश्वराचा विवेक तुमच्याकडे हवा, लोकांशी कसं वागायचं, ते महत्त्वाचं आहे, मी योगेश्वर कां म्हणजे, कारण गुरुच्या स्थितीमध्ये सामुहिकतेच्या पातळीवर यावं लागतं, वैयक्तिक पातळी संपते आणि तुम्ही सामुहिकतेमध्ये जाता, एके काळी सोडवले गेले भवसागराचे तुमच्या प्रश्नांमध्ये दहा प्रश्न तुम्ही समजूं शकता, तुम्ही विशुद्धीचे १६ प्रश्न सोडविले आहेत. आतां तुम्ही आज्ञेवर येता. आणि आज्ञा चक्रावर इतका प्रचंड त्याग आहे. न कळत त्याग थांबला आहे, आणि त्या अतित स्थितीमध्ये आपण कशाचा त्याग करीत आहोत हे आपल्याला पहावं लागतं कारण, आपण कशाचाही त्याग करीत नाही, सर्व कांही आधीच त्यजलेलं असतं, तर त्याग करण्यासारखं काय आहे?

आणि, आपण आत्मसाक्षात्कारी आत्मे आहोत हे जाणून अशी स्थिती साध्य करायची असते, आणि तुम्ही सर्वसामान्य लोक नाही, आणि यम नियमासारखी साधी सर्वसामान्य नियमावली तुम्हाला लागू पडत नाही.

नियम तुमच्यासांठी असतात, यम इतरांसाठी, कांही नाही, तुमच्यामध्ये पूर्ण सत्य असलं पाहिजे, इतकं की, तुम्ही ते व्यक्त केलं पाहिजे आणि या सर्व सत्यांमध्ये शक्ति असते, तुमच्यामध्ये प्रस्थापित झालेल्या प्रत्येक सत्यामुळे, तुम्हाला कांही करावं लागत नाही. ते स्वतःहून कार्य कार्यान्वित करतात.

तर प्रथम तुमची चक्रं तुम्ही व्यवस्थित ठेवली पाहिजेत, चक्रांवर तुमचं चित्त तुम्ही ठेवलं पाहिजे, समाधीच्या स्थितीनंतर तुम्ही त्यांना योग्य रितीने उघडविण्याचा सुरुवात कराल. त्यांना स्वच्छ कराल, कोणती चक्रं खराब होत, ते कळेल, थोडीशी खराब चक्र आणि अनेक चांगली चक्र असलेले आणि वाईट चक्रांची दखल न घेणारे लोक मी पाहिले आहेत.

तुमच्या खराब चक्रांवर चित्त ऱ्या, त्या स्वच्छ करा, स्वच्छ करा, तुमचं पूर्ण लक्ष त्या चक्रांकडे द्या. देवाचं, ज्या देवतेची तुम्ही उपासना करतां तिचं पूर्ण चित्त तिथे द्या आणि मधल्या शक्तिंचं संपूर्ण प्रकटीकरण तुम्हाला सापडेल.

तर, सर्व चक्रं स्वच्छ करा, सर्व प्रदेश प्रस्थापित होऊ द्या. आणि प्रदेश प्रस्थापित झाल्यावर इतरांशी सामुहिक पातळीवर तुम्हला सुसंवाद प्रस्थापित केला पाहिजे. नंतर, ती स्थिती जिथे आज्ञा चक्रावर तुम्ही पूर्णपणे आत्मरुप होता, सहजयोगामध्ये ते सर्वात सोपं आहे. आणि त्याचं कारण, मी तुम्हाला सांगीतलं आहे. कारण, तुम्ही किती नशिबवान लोक आहांत, सोप्यांत सोपा सहजयोग आहे, सहजयोगांचा सार म्हणजे तो करायला सर्वात सोपा, आणि म्हणून तुमच्यासांठी पूर्णपणे सोप्या केल्या गेलेल्या, या सोप्या पद्धतीचा तुम्ही पूर्ण फायदा घेतला पाहिजे, हे गुरुपुजेचे तुम्हांला आर्शिवाद आहेत की, पुढच्या वर्षापर्यंत तुम्ही गुरु बनलं पाहिजे, तुमच्याकडे फक्त भक्ति पाहिजे, आणि आज तुमच्या ह्रदयामध्ये म्हणा, ह्रदयापासून मला वचन द्या, की, माताजी, आम्ही नुसते प्रयत्न करणार नाही, तर आम्ही ते होऊ आणि तीन वेळा तुम्ही म्हणा, आम्ही होऊ, आम्ही होऊ, आम्ही होऊ.

प्रथम, मला तुम्हाला सांगायचं आहे की, आतां माझी साठी वर्ष पूर्ण झाली आहेत, आणि आतां माझा वाढदिवश साजरा करायचा नाही, हाच शेवटचा, कृपा करून हे लक्षांत ठेवा की, तुम्ही जे कांही म्हटलं, त्याचा मी स्वीकार केला कारण ६० वा वाढदिवस फार शुभ असतो, यानंतर माझ्या साठाव्या वाढदिवसाचा आणखी सोहळा नाही.

आतां सर्व युरोपियन लोकांतर्फे कांही भेटवस्तू मला देण्याचा तुम्ही विचार केला आहे, मी त्याचा स्वीकार केला आहे, पण आता (आता संपूर्ण गेलेल्या ६० व्या वाढदिवसानिमित्त) अशा तऱ्हेच्या आणखी कांही योजना नको. मी तुम्हाला अगदी स्पष्ट सांगते आहे. तर आतां कोणी ही माझा साठावा वाढदिवस साजरा करणार नाही, तुम्हाला हे स्पष्ट झालयं.

तर, सहजयोगांत गुरु आणि आई बद्दलच्या चालिरीती अनुभवाने समजावून घ्यायच्या असतात. पण त्याचा अर्थ असा नाही की, त्यांची दुसरी बाजू अनुभवण्यासाठी तुम्ही दुसऱ्या टोकाला जावं.

हे नियम जसजसे तुम्ही जास्त जास्त संभाळाल, तसे तसे, तुम्हाला जास्त मदत मिळालेली कळेल. दोन स्त्रीयांना बेल्जियमला जायचं होतं. मी त्यांना म्हटलं, ह्या उद्या जाणार आहेत आणि त्या म्हणाल्या, "नाही, त्या आज जाणार आहेत. तो म्हणाला "श्री. माताजींनी तुम्ही उद्या जाणार असं म्हटलं. तर, कांही कां असेना तुम्ही उद्या जा." त्या

म्हणाल्या "नाही, आम्ही आज जाणार आहोत, आम्ही उद्या जाणार असं कसं म्हटलं श्री. माताजींनी?" त्या ऐकेनात. तेव्हां त्याने त्यांना विमानतळावर पाठवलं आणि तिथे त्यांना आढळलं की, त्यांना दुसऱ्या दिवशी जायचं आहे.

तर, ते तशा प्रकारचं आहे की, या वागण्याच्या चालिरिती अशा हव्या की, "हो, माताजींनी म्हटले आहे, कांही हरकत नाही. हे चूक होईल तरीही हरकत नाही. त्या जे कांही म्हणाल्या, त्याप्रमाणे ऐकून करून पाहूया."

अनुभव घेऊनच तुम्हाला कळेल. पण सुरुवातीला तुम्ही म्हणाल, "नाही, आपण असं आणि तसं करणार नाही." ते चांगलं नाही.

तर हे नितीनियम सोप्यांत सोपे आहेत. ते सहजयोगाचं मूलतत्व आहे. आणि सहजांत सहज हे नितिनियम आहेत.

मुद्दा असा आहे की, सहजयोगांमध्ये चांगली वाढ होणे म्हणजे रिती रिवाज माहित असणे, जे तुम्ही इतरांना विचारु शकता, अनुभवी लोकांना तुम्ही विचारु शकता, किंवा तुम्हाला स्वतःला अनुभव घ्यायचा असेल तर, तो घेऊ शकता, पण, कांही लोक उलट रित्या करतात, जसं मला उलट उत्तरं देऊन, नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगून "बघू या, प्रयोग करू या. काय होतंय" आणि नंतर ते दुखापती होऊन, माना मोडून, परत येतात माझ्याकडे, त्यांना बरं करायला.

तर ते होता नये, अनुभव चांगल्यासांठी हवा, आणि तशाप्रकारे, इतरांना विचारुन, त्यांचा सल्ला घेऊन, जे लोक सर्वसामान्य पातळीच्या वर आहेत त्यांना रिती विचारुन घ्याव्या. तुमचा प्रोटोकॉल तुम्ही कसा सुधारु शकतां याकडे चित्त द्या. प्रोटोकॉल व्यवस्थित पार पाडण्यासांठी आपण काय केलं पाहिजे, आपण काय अयोग्य करीत आहोत, आपण कुठे चुका करत आहोत, कारण, आज सहजयोगाचं सार त्याचे नियम आहेत, जे अगदी साधे आहेत, करायला. अगदी साधी गोष्ट हवी आणि एकदां का तुम्हाला समजलं तर, जर त्यांनी सांगीतलं आहे, तर तसं व्हायचं आहे, तर मग, ठीक आहे, पण कांही लोक इतके विचित्र असतात, की कोटेशनसारखं मला वापरतात, 'श्री. माताजींनी सांगीतलं आहे प्रत्येकाने उपास केलेच पाहिजे,' मी कोणाला तरी सांगीतलं होतं, "जा, तूं उपास केलेला बरा" तर, लगेच, दुसऱ्या दिवशी सडपातळ माणूस चक्कर येत येत येतो, मी म्हणाले, "काय झालं"? मी जेव्हां एकाद्या विशिष्ठ व्यक्तिला कांहीतरी सांगते तेव्हां, ते नुसतं सगळीकडे फिरतात, कारण त्यांना वाटतं, मी एकटा कशाला उपास करू? सर्वांनी तो केला पाहिजे, ते नेहमीच माझं बोलणं 'कोटेशन' सारखं वापरतात, तो मला एक मोठाच प्रश्न होऊन पडला आहे. कोणीही, 'मी असं म्हटलं असं दुसऱ्याला सांगायचं नाही, एक महत्वाची गोष्ट आहे. तुम्हाला जे कांही सांगायचं असेल, ते नोटीस बोर्डावर लावा, हवंतर माझी सही घेऊन. ते बरं, सर्वसाधारण गोष्टींसाठी आणि विशिष्ठ गोष्टींसाठी जेव्हां मी सांगते त्यावेळी, त्या विशिष्ठ कारणांसाठी ते करा. कमीत कमी, तेव्हढा तरी सारासार विचार ठेवा. आपण सर्वांना सारासार विचार पाहिजे. आणि प्रयत्न करा, तुम्हाला खूप मदत मिळेल. तुम्हाला किती मदत मिळाली, त्याचं तुम्हालाच आश्चर्य वाटेल, कारण ते सर्वांसाठी आहे, सर्व कांही तुमच्या भल्यांसाठी आहे, आणि रितीरिवाजांचे सार तुम्हाला कळलं, तर विशेष आर्शिवाद आहेत. तर, मी तुम्हाला त्या ठिकाणी नेते आहे जिथे तुम्हाला हे कळू लागेल की, तसं तर माताजी कडे कांहीच समर्पण करायचं नसतं, कारण त्या कांहीच घेत नाहीत, त्यांच्याकडे कांहीच जात नाही, जे कांही आपल्याला नको आहे, ते सोडून देऊन आपण स्वतः शरणागत जाणं इतकंच. ती फार सुरेख प्रक्रिया आहे जिचा आपण अवलंब करावा.

तुम्ही सारे इतके वर आलांत आणि पुढे खूप जायचं आहे, तुम्ही पुढे जाल, पुढच्या वर्षापर्यंत महान गुरु व्हाल अशी मला खात्री आहे.

# स्वतःचा गुरु कसं व्हायचं?

स्वमध्ये रहाणं –

शहाणा लिडर पावित्र्याचा देखावा करीत नाही. किंवा, चांगल्या कृतींसाठी श्रेण्या देत नाही. कारण, त्यामुळे यश आणि अपयश यांचं वातावरण निर्माण होईल. त्यामागून चढाओढ आणि मत्सर होतील.

समान वर्तणूक –

हे माहित असल्याने आपण कोणी 'विशेष' आहोत असा देखावा लिडर करीत नाही. इतरांबद्दल चकाट्या पिटत गप्पा मारत नाही. किंवा, एकमेकांशी स्पर्धक अशा सिद्धांताच्या गुणवत्तेविषयीची चर्चा करण्यांत वेळ घालवित नाही.

निःस्वार्थीपणा –

प्रकाशित लिडरशीप ही सेवा आहे, स्वार्थ नव्हे. स्वतःच्या हिताच्या आधि सर्वांचं हित ठेवल्याने लिडर जास्त वाढतो, जास्त टिकतो.

निस्वार्थी होऊन लिडर 'स्व' ला वाढवितो –

लिडरचा विचार करा. लिडर कोणत्याही परिस्थितीमध्ये कांहीही तक्रार न करतां, काम करतो, कोणत्याही व्यक्तिबरोबर, किंवा जे कांही काम असेल, ते सर्वांना हितकारी होईल अशारितीने करतो. पगाराची अपेक्षा न करतां चांगली सेवा करतो. लिडर साधेपणाने प्रामाणिक बोलतो, प्रकाश पाडण्यासाठी मध्ये पडतो आणि सुसंगती निर्माण करतो.

चांगला समुह –

नेत्रदीपक समुहापेक्षा चांगला समुह बरा.

जेव्हां लिडर्स सुपरस्टार होतात, त्यावेळी शिक्षक त्यांच्या शिकवणीला मागे टाकून आधिक तेजाने झळकतात.

फार थोडे सुपरस्टार व्यवहारी असतात.

किर्ती किर्तीला जन्म देते. आणि, थोड्याच वेळांत स्वतःहूनच ते वहावत जातात. आणि मग मध्यापासून ते बाजुला जातात, आणि वेगाने खाली आदळतात.

सूज्ञ लिडर, चांगलं कार्य करण्यामध्ये स्थिर/प्रस्थापित होतो आणि इतरांसाठी व्यासपीठ मोकळं करतो. जे कांही घडतं त्याच्या यशामुळे

मिळालेला सर्व नावलौकिक, मानमान्यता लिडर स्वतःकडे घेत नाही. किर्तीची त्याला गरज नसते.

मध्यम दर्जाचा अहंकार सूज्ञता प्रदर्शित करतो.

निःपक्षपाती लिडरशीप –

कोणत्याही पक्ष न घेता, किंवा, आवडत्यांना उचलून न धरतां, कोणत्याही भावनिक प्रश्नांमध्ये तुम्ही मध्यस्थी करू शकतां कां?

उत्कट इच्छा किंवा भिती यांच्या सान्निध्यांत, तुम्ही मोकळा श्वास घेऊन शांत राहू शकतां कां?

तुमच्या मनांतला गोंधळ निपटला आहे कां?

तुमचं घर स्वच्छ आहे कां?

सर्व क्रिया तुम्ही हळुवारपणे करतां कां? आणि तुमच्या गटावर दबाव आणतां त्याचं नेतृत्व करतां कां?

कोणाताही प्रश्न उद्‌भवू नये तुम्ही त्याचा उघडपणे स्वीकार करतां कां?

काय येणार आहे हे माहित असतांना देखील इतरांनी ते स्वतःहून शोधून काढेपर्यंत तुम्ही स्वतःची शांती कायम ठेवतां कां?

हे तुम्ही निःपक्षपाती, स्वच्छ आणि व्यवहारी असतांना करूं शकतां कां?

सुईण होणं –

सूज्ञ लिडर कारण नसतांना, मध्ये पडत नाही, लिडरचं अस्तित्व जाणवतं पण अनेकदां गट स्वतःच कार्य करतो. कमीप्रतीचे लिडर खूप कार्य करतात. खूप बोलतात, त्यांचे अनुयायी असतात, ते 'कल्ट-तत्वप्रणाली' चालू करतात.

त्याहून वाईट प्रतीचे, गटाला उत्तेजना देण्यासाठी भीतीचा उपयोग करतात. आणि प्रतिकाराला तोंड देणे भाग पाडतात.

फक्त सर्वात भयावह लिडर्सचं नांव वाईट होतं.

दुसऱ्या व्यक्तिची कार्यपद्धती तुंम्ही सुलभ करीत आहांत हे लक्षांत ठेवा. ती तुमची कार्यपद्धती नव्हे. आगंतुकपणा करूं नका. निमंत्रण करूं नका, तुमच्या स्वतःच्या गरजा आणि स्वतःची अंतरंग जाणण्याची कुवत पुढे आणण्यावर भर देऊ नका. तुमचा जर एकाद्या व्यक्तिच्या कार्यपद्धतीवर विश्वास नसेल, तर, ती व्यक्ति तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही.

तुम्ही सुईण आहांत अशी कल्पना करा, दुसऱ्या कोणाचा तरी जन्म होण्यासाठी तुम्ही सहाय्य करीत आहांत, देखावा किंवा उगाच धांदल

न करतां सर्वकांही करा. काय घडावं याविषयी तुम्हाला जे वाटतं, त्यापेक्षां जे कांही घडत आहे त्याचा मार्ग सुकर करा. जिथे घ्यायला पाहिजे, तिथे तुम्ही पुढाकार घ्या. ज्यामुळे आईला मदत होईल, तरीही ती मोकळी असेल आणि सर्वांचा तावाही तिच्याकडे असेल.

ज्यावेळी मूल जन्माला येईल त्यावेळी आई योग्य तेच बोलेल ''आपणच ते सगळं केलं''.

विरोधाभास पकड सोडून देण्याचा –

हे स्त्रीचं शहाणपण आहे, साध्य करण्यासांठी हातातलं सोडून द्यायचं. सूज्ञ लिडर याचंच प्रदर्शन करतो.

स्तब्ध रहा –

सूज्ञ लिडर फार कमी वेळा आणि मोजकंच बोलतो. नाहीतरी, कोणतांही नैसर्गिक अविष्कारण सतत चालू रहात नाही. पाऊस पडतो, नंतर थांबतो, गडगडाट होतो, नंतर थांबतो.

स्वतःच्या कृतिपेक्षा स्वतःच्या अस्तित्वाने लिडर जास्त शिकवितो. मोठमोठ्या भाषणांपेक्षा व्यक्तिची शांतता जास्त गोष्टी व्यक्त करते.

स्तब्ध रहा, तुमच्या अंतर्यामीच्या शहाणपणाला अनुसरा. तुम्हाला स्तब्ध राहिलं पाहिजे.

जो लिडर स्तब्ध रहाणं जाणतो, आणि ज्याची जाण गहन असते, तो परिणामकारक होतो, पण जो लिडर बडबड करतो, सतत वल्गना करतो आणि गटाला प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो त्याला मध्य नसतो आणि त्याचं मुळीच वजन पडत नाही.

सहजतेत घ्या –

फार परिश्रम घेतले तर अनपेक्षित निकाल लागतात. चकाकणाऱ्या लिडरमध्ये स्थिरता नसते.

कामाची घाई करण्याने तुम्ही कुठेच पोहोचू शकत नाही. अतिशय हुषार दिसण्याचा प्रयत्न करणं, म्हणजे प्रकाशित असणं नव्हे, असुरक्षित लिडर्स त्यांच्या हृदयाचंच भांडवल करतात. तुम्ही किती पवित्र आहांत, हे दाखवणं जास्त पवित्र नाही. या प्रकारची सगळी वागणूक असुरक्षिततेमधुन यते, ती असुरक्षिततेला खाद्य देते, त्यांच्यातलं कांहीच कामाला मदत करीत नाही. लिडरच्या आरोग्याच्यासुद्धा त्याचा कांहीही हातभार नसतो, गोष्टी कशा घडतात, हे ज्या लिडरला माहीत असतं, तो खालील गोष्ट करीत नाही.

लक्षांत घ्या –

तुम्ही स्वतः इतके चांगले आहांत, असं तुम्हाला वाटतं त्यावेळी, स्वतःची तुम्ही कोणाबरोबर तुलना करीत असतां? देवाबरोबर? कीं, तुमच्या स्वतःच्या असुरक्षितते बरोबर? तुम्हाला किर्ती हवी आहे कां? किर्ती तुमचं आयुष्य किचकटीचं करेल, आणि तुमच्या हालचालींत साधेपणाशी तडजोड करा. तो पैसा आहे कां? श्रीमंत होण्याचे प्रयत्न तुमचा वेळ चोरतील.

कोणत्याही प्रकारचा अहंकार, स्वार्थीपणा तुमच्या अंतर्यामीच्या आत्म्याला झांकाळतो आणि गोष्टी कशा घडतात, त्याविषयी तुम्हाला आंधळं बनवितो.

केंद्रांत आणि मध्यावर –

केंद्रबिंदू आणि मध्यावर असणाऱ्या लिडरला स्थैर्य आणि आत्म्याची जाणीव असते.

ज्याला स्थैर्य नसतं, तो लिडरशीपच्या उत्कटतेने वाहून जातो, आणि पारखण्यांत चुका करतो, आणि कधीकधी आजारही पडतो.

दबाव आणि भांडण –

कार्यपद्धतील कशाप्रकारे उलगडते आहे हे जाणणारा लिडर कमीत कमी जोर लावतो आणि, लोकांवर दबाव न आणतां, त्या गटाला कार्यान्वित करतो.

ज्यावेळी जोर लावला जातो, तेव्हां भांडणं, वादविवाद उदभवतात, गटाचा ऱ्हास होऊ लागतो, वातावरण ना उघड, ना पोषक असं प्रतिकूल होतं.

विशिष्ट प्रकारे गटाचं काम चालू रहाण्यासाठी भांडण न करतां, सूज्ञ लिडर ते सुरळीत चालू ठेवतो. लिडरचा स्पर्श हळूवार असतो. लिडर आक्रमण करत नाही किंवा बचावही करत नाही.

सर्व एकत्रच –

सूज्ञ लिडर या तत्वाचा अवलंब करतो आणि स्वार्थीपणाने वागत नाही, एका माणसाला स्वीकारायचं आणि दुसऱ्याशी काम करायला नाकारायचं, असं लिडर करीत नाही. लोकांना तो स्वतःसाठी वापरत नाही किंवा त्यांच्या आयुष्याचं नियंत्रण करीत नाही, लिडरशीप ही जिंकण्याची गोष्ट नाही.

जे कांही घडत आहे, त्यावर उजेड पाडण्याचा दृष्टीने काम केलं जातं. शिवाय कांहीही आडपडदा न ठेवतां निःस्वार्थ सेवा सर्वांना मिळते.

मूर्ख दिसणं –

लिडरची स्तब्धता गटाच्या खळबळीवर मात करते, लिडरची जाणीव हे या कार्याचं प्राथमिक साधन आहे.

इथे आणि आतां –

इथे आणि आतां काय घडत आहे, यावरुन सूज्ञ लिडरला गटामध्ये काय चाललं आहे ते कळतं, वेगवेगळ्या सिध्यांतामध्ये भटकण्यापेक्षा

हांतातल्या परिस्थिती विषयी क्लिष्ट अर्थ लावण्यापेक्षा ते जास्त प्रभावी आहे स्तब्धता, स्पष्टपणा, आणि जाणीव हे मन इतर मनोव्यापारांत व्यर्थ खर्च करण्यापेक्षा जास्त जवळचं आहे.

असं भरकटणं कितीही उत्तेजक असलं तरी, खरोखर जे कांही होतं असतं त्याच्यापेक्षा लिडर व गटाचे सभासद दोघांचे चित्त ढासळणार असतं.

हजर राहिल्याने आणि काय होत आहे, त्याची जाणीव ठेवल्याने लिडरला करावं लागतं, पण बरचंसं साध्य होतं.

सुरुवात, मध्य आणि शेवट –

संपायला येत असतानाच कांही लिडर कामाचं गुपित सांगून टाकतात ते फार उत्सुक होतात. निष्पन्न होणाऱ्या काही गोष्टींमध्ये ते गुंतून जातात, ते बेचैन होतात आणि चुका करतात, काळजी घेण्याची, नीट शुद्धीवर असण्याची, हीच वेळ असते, जास्त करूं नका, जास्त मदत देऊ नका, कांही केल्याबद्दल त्याचा बहुमान मिळेल त्यांची काळजी करू नका.

कारण सूज्ञ लिडरला कांहीही अपेक्षा नसतात.

कोणत्याही परिणमाला अपयश म्हणतां येत नाही, लक्ष पुरवून, नैसर्गिक प्रकटीकरणाला वाव देऊन, आणि बहुतेक वेळ मागे राहून, ती गोष्ट समाधानकारकरित्या संपुष्टांत आलेली लिडर पहातो.

नम्र आणि उघड –


व्यक्तिगत गोष्टी पुढे करण्यापेक्षां, जो लिडर त्यांचं जीवन सुलभ करतो त्याचं गटाचे सभासद मनःपूर्वक कौतुक करतात. लिडर स्पष्टवक्ता व मोकळेपणाने बोलत असल्याने कोणतीही गोष्ट माडताच येते.

लिडरला कोणतीही बाजू सुरक्षीत ठेवायची नसते, तो कोणाबद्दलही आवड दाखवित नाही, त्यामुळे कोणालाही अनादर करत नाही, कोणालाही भांडण्याची इच्छा नसते.

वाकणारा की ताठ –

कडक लिडर कदाचित पुनरावृत्तीचं किंवा नीट आंखणी केलेल्या कामांचं पुढारीपण करूं शकतो, पण चैतन्यमय गटाच्या कार्यपद्धतीला पुरा पडूं शकत नाही.

जे कांही वाकणारं आणि वाहणारं असतं, ते वाहतं. जे कठीण आणि अडवलेलं असतं, ते झिजतं आणि मरुन जातं.



# देवी सूक्त (ऋग्वेद १२५)

१) रुद्र, वसु, आदित्य आणि विश्वदेवांबरोबर मी नेहमी संचरण करते. मित्र आणि वरुण, इंद्र आणि अग्नि तसेच दोन्ही अश्विनीकुमार यांनाही माझाच आधार आहे.

२) पराक्रमी सोम, तसेच त्वष्टा, पूषा आणि भग या देवांचेही भरणपोषण मीच करते, देवांना हवि समर्पित करणाऱ्या यजमानांनासुद्धा धन मीच देते.

३) यज्ञाई देवांमध्ये मुख्य होऊन त्या सर्वांचे ज्ञान ठेवाणारी, विविध संपदांचा संग्रह करणारी, सम्राज्ञी, मी आहे. देवांनी अनेक वस्तुंमध्ये, अनेक रुपांत माझा प्रवेश घडविला आणि अनेक स्थानांमध्ये माझी स्थापना केली.

४) डोळ्यांनी पहाणारे जे, जे प्राणी आहेत, जे, जे श्वासोच्छ्वास करतात, जे बोललेलं ऐकू शकतात, ते माझ्यासांठीच आपापले अन्न भक्षण करतात.

५) देवांनी आणि सुज्ञ लोकांनी (आत्मसाक्षात्कारी) या गोष्टीला प्रसन्नतेने मान्यता दिली आहे. ती गोष्ट मीच तुम्हाला सांगते आहे, ज्याच्यावर मी प्रसन्न होते त्याला उग्र योद्धा, ऋत्विज, द्रष्टा ऋषि किंवा अत्यंत प्रभावशाली पुरुष करूनच सोडते.

६) आपल्या ब्रह्मांच्या विद्वेषींचा वध करण्याच्या उद्देशाने शरसंधान करण्यासाठी, रुद्रावर अनुग्रह करण्याच्या विचाराने मी त्याचं धनुष्य झुकवून सज्ञ करते, तसेच लोकांच्या इच्छेसाठी मी युद्ध लावते, स्वर्ग आणि पृथ्वी दोघांतही सर्वत्र मी प्रविष्ट होऊन रहाते.

७) या विश्वाच्या कलशावर विश्वपित्याचं निर्माण मीच करते माझं विश्रामस्थान दिव्य समुद्राच्या आंत खोल पाण्यामध्ये आहे. तिथून अस्तित्वांत असणाऱ्या सर्व जागांमध्ये मी प्रसार करते, आणि माझ्या शिराने स्वर्गाला मी नित्य स्पर्श करते.

*अहं रुद्रभिर्व सुभिश्चराम्यहमदित्यैरुत विश्वदेवै : ।*
*अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहमिन्द्राग्नी अहमश्विनोभा ॥*

*अहं सोममाहनसं बिभर्म्यहं त्वष्टारमुत पूषणं भगम् ।*
*अहं दधामि द्रविणं हवीष्मते सुप्राव्ये यजमानाय सुन्वते ॥*

*अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी, प्रथमा यज्ञियानाम् ।*
*तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थानां भूर्यावेशयन्तीम् ॥*

*मया सो अन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणिति य इ शृणोत्युक्तम् ।*
*अमन्तवो मां त उपक्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धिवं ते वयामि ॥*

*अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं देवेभिरुत मानुषेभिः ।*
*यं कामये तंतमुग्रं कृणामि तं ब्रह्माणं तमृर्शिं तं सुमेधाम् ॥*

*अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा रे ।*
*अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ॥*

*अहं सुवे पितरमस्य मूर्धन् मम योनिरप्स्वन्तः समुद्रे ।*
*ततो वि तिष्ठे भुवनानु विश्वोतामूं द्यां वर्ष्मणोप स्पृशामि ॥*

